—: जाहिर निविदा :—

जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथील नविन इमारतीमध्ये नव्याने येणाऱ्या न्यायीक अधिकारी यांचे फलक तयार करणे तसेच पदनामामध्ये होणाऱ्या बदलामुळे फलकांमध्ये दुरुस्ती करणे तसेच अधिक्षक व सहाय्यक अधिक्षक यांचे नावाचे व पदनामाचे फलक (size ३०" x २२"cm) तयार करुन बसविणेकरिता अहमदनगर येथील स्थानिक बाजारपेठेतील अधिकृत फर्मकडून दरपत्रके मागविण्यात येत असून त्यासाठी खालील अटी व शर्ती लागू राहतील.

त्याबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :—

१. आपल्या फर्मचा परवाना असणे आवश्यक आहे.
२. आपले फर्मचे नावाने पॅन असणे आवश्यक आहे.
३. आपल्या फलकांचे दरपत्रक सिलबंद पाकीटात देणे आवश्यक आहे.
४. सिलबंद पाकीटावर दरपत्रक कशाचे आहे ते लिहिणे आवश्यक आहे.
५. सिलबंद पाकीटावर मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, डि.एस.पी. चौक, अहमदनगर यांचे नाव व पत्ता लिहिणे आवश्यक आहे.
६. सिलबंद पाकीटे स्वत: अथवा आपल्या प्रतिनिधी/पोस्टाद्वारे या कार्यालयाच्या आवक टेबलकडे आणून दयावेत.
७. दरपत्रकामध्ये लहान मोठया अक्षराचे व आकाराचे दर लिहिणे आवश्यक आहे, अपूर्ण दरपत्रक नाकारण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आलेला आहे.
८. सदरहु दरपत्रक दिनांक २७/१०/२०२६ रोजी सायंकाळी ०६—०० पर्यंत देणे आवश्यक आहे.
९. तत्पर व जलद सेवा देणा—या फर्मना प्राधान्य देण्यात येईल.
१०. दरपत्रकाबाबत दबाव आणण्याचा प्रयत्न करु नये अन्यथा दरपत्रक नाकारण्याचा अधिकार जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.
११. कोणतेही कारण न देता दरपत्रके अस्विकार करणेचा अधिकार जिल्हा न्यायालय, अहमदनगर या कार्यालयाने राखून ठेवलेला आहे.
१२. ज्यांचे दरपत्रक वरील अटींचे व शर्तीची पूर्तता करुन कमी दराचे असेल त्यांचेच दरपत्रक स्विकारण्यात येईल.

सदरचे दरपत्रक मंगळवार दिनांक २७/१०/२०२६ रोजी सायंकाळी ०६—०० पर्यंत मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, डि.एस.पी. चौक, अहमदनगर यांचे कार्यालयात आणून देणे आवश्यक आहे.

हुकूमावरुन,

जिल्हा न्यायालय, अहमदनगर
दिनांक :—१६/१०/२०२६

जिल्हा न्यायालय अहमदनगर

१६/१०/२६
अधिक्षक,
लेखा व वित्त विभाग,
जिल्हा न्यायालय, अहमदनगर

प्रत :—

१. मा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर,
२. मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर,
३. मा. कोषागार अधिकारी, अहमदनगर,
४. मा. आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर,
५. जिल्हा न्यायालय, अहमदनगर ई—कोर्ट साईट.